MHKO100003292022

**नियमीत दिवाणी दावा क्र. ७५/२०२२**

मयोद्दीन मुल्ला.
विरुध्द
निखत मुल्ला.

**निशाणी क्र.२४ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीतर्फे अर्जास निशाणी क्र.२५ येथे म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा मुस्लीम लॉ प्रमाणे नांदणेस येणेसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१४ अन्वये दिनांक २९/०९/२०२२ रोजी दाखल केले आहे. त्यानंतर सदर प्रकरण निशाणी क्र.१४ चे उलटतपासावर ठेवण्यात आले. प्रतिवादी यांना संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रथम दिनांक ०२/०८/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर, प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२१ येथे अर्ज दिलेने सदर उलटतपास नाहीचा आदेश रक्कम रु.५००/- च्या खर्चासह मंजुर करणेत आला. त्यानंतर, प्रतिवादी यांना संधी देऊन देखील त्यांनी उलटतपास घेतला नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द पुन्हा दिनांक २३/११/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच काळापासून प्रलंबीत आहे. त्याबाबत प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केले आहे की, प्रतिवादी हया दरम्यानचे काळात आजारी होत्या व त्यांचे पोटात गाठ झाली होती. सदरची बाब प्रतिवादीस दिनांक ०२/११/२०२३ रोजी सोनोग्राफी केल्यानंतर समजुन आली. त्यानंतर, प्रतिवादी हया डॉक्टरांच्या सल्यानुसार औषधोपचार घेत असुन डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला होता. त्यामुळे, प्रतिवादीस न्यायालयात हजर राहून वकीलांना योग्य ती माहिती देता आली नाही. सबब, प्रतिवादीस वादीचा उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केलेल आहे. परंतु, प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादीस नि.२१ वरील आदेशानुसार वादीचा उलटतपास घेण्याकरीता संधी देण्यात आली होती. परंतु, वादीने सदर आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम न भरल्याने आणि संधी देऊन देखील उलटतपास न घेतल्याने पुन्हा उलटतपास नाही असा आदेश पारीत झालेला आहे. त्यामुळे, प्रकरणाची परिस्थिती व नमुद कारण पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली काढणेकरीता प्रतिवादीस बचावाची संधी

देणेदेखील योग्य वाटते. प्रतिवादीमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु. २,०००/- (रुपये दोन हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादीने पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.04.04 18:03:23 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०४/०४/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 04/04/2024 |
| Order signed by P.O. on | 04/04/2024 |
| Order uploaded on | 04/04/2024 |